# मुलींचे संगोपन; सामाजिक जबाबदारी

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. विभुती पटेल यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मुलींचे संगोपन आणि कौशल्यवर्धक प्रगती ही सामाजिक जबाबदारी म्हणून त्याकडे पाहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मुंबई येथील ज्येष्ठ विचारवंत डॉ. विभुती पटेल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'बेटी बचाओ' अभियानांतर्गत समाजशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'गर्ल चाईल्ड इन इंडिया-इश्युज अँड प्रॉस्पेक्टस्' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय वेबीनार आयोजित करण्यात आले होते. यात डॉ. पटेल बोलत होत्या. याप्रसंगी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. पटेल म्हणाले, आज आपल्या देशामध्ये मुली सर्व क्षेत्रांमध्ये अग्रेसर आहेत. त्यांच्या गरूडझेपेपासून कोणतेही क्षेत्र अलिप्त राहिलेले नाही. देशाच्या प्रगती आणि विकासामध्ये मुलींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. परंतु, आजही काही ठिकाणी त्यांना भेदभावासह योग्य सामाजिक दर्जा प्राप्त करण्यासाठी झगडावे लागत आहे.

दोन दिवसीय वेबीनारमध्ये देशभरातून १ हजार २०० हून अधिक जणांची नावनोंदणी झालेली होती. यावेळी पुणे येथील प्रा. श्रुती तांबे, मुंबई येथील मेधाविनी नामजोशी, नवी दिल्ली येथील जयश्री वेलनकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या डॉ. आसावरी जाधव यांनी केले. पाहुण्यांची ओळख 'बेटी बचाओ' अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी अधिविभागातील स्नेहल पाटील व कल्याणी साठे यांनी केले. यावेळी विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांसह अनेकांनी सहभाग नोंदवला.

# डॉ. नमिता खोत यांना 'डायनामिक लायब्ररी अॅवॉर्ड'

**कोल्हापूर, ता. २३ :** शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता बाबासाहेब खोत यांना 'मोस्ट डायनामिक लायब्ररी अॅवॉर्ड' प्रदान करण्यात आले. डायनेरजिक बिझनेस सोल्युशन संस्थेतर्फे शिक्षणातील श्रेष्ठतम गुणवत्ता व नेतृत्व या ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेत अॅवॉर्ड ऑनलाईन पद्धतीने दिले. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात डॉ. नमिता खोत यांनी केलेले



डॉ. खोत

नावीन्यपूर्ण कार्य, उपक्रम आणि विद्यार्थ्यांना दिलेले प्रोत्साहन यांची दखल घेऊन हे अॅवॉर्ड दिले. डॉ. खोत यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात कार्य करीत आहेत. शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद महाविद्यालय, डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मुक्त विद्यापीठात काम केले आहे.

पुण्य नगरी

# अंतिम सत्र परीक्षेसाठी ऑनलाइन, ऑफलाइन पर्यायांची यादी संकेतस्थळावर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दि. २७ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षेसाठी परीक्षार्थ्यांनी ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीच्या परीक्षेच्या पर्यायाची विद्यार्थीनिहाय यादी परीक्षार्थींच्या माहितीसाठी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्याचबरोबर सदरची यादी सर्व संबंधित अधिविभाग तसेच महाविद्यालये यामध्ये उपलब्ध आहे. तरी परीक्षार्थ्यांनी त्याबाबत पडताळणी करून खात्री करून घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागामार्फत करण्यात आले आहे.

विद्यापीठातर्फे सर्व परीक्षार्थ्यांना त्यांनी निवडलेल्या पर्यायाची माहिती एसएमएसद्वारे कळविण्यात आली आहे. ज्या परीक्षार्थ्यांनी नव्याने ऑफलाइनमधून ऑनलाइन परीक्षा पद्धतीचा पर्याय निवडलेला आहे त्यांना त्यांचे लॉगीन व पासवर्ड पाठवण्यात येत आहेत. दि. २७ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या पदविका, पदव्युत्तर पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रम वगळता सर्व अभ्यासक्रमांची परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून सदरची वेळापत्रके संबंधित अधिविभाग आणि महाविद्यालयांना पाठवण्यात आली आहे. परीक्षार्थ्यांनी सदरची वेळापत्रके अवलोकनी घेऊन परीक्षेची तयारी करावी. अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा देणाऱ्या सर्व परीक्षार्थ्यांसाठी सूचना व मार्गदर्शन करणारे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच ते सर्व अधिविभाग आणि महाविद्यालयांना परीक्षार्थींच्या निदर्शनास आणण्यासाठी पाठवण्यात आले आहे.

# मुलींची प्रगती ही सामाजिक जबाबदारी

## डॉ. विभूती पटेल; शिवाजी विद्यापीठात २ दिवसीय राष्ट्रीय वेबिनार

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २३ : मुलींचे संगोपन आणि कौशल्यवर्धक प्रगती ही सामाजिक जबाबदारी म्हणून पाहण्याची गरज असल्याचे मत मुंबई येथील ज्येष्ठ विचारवंत डॉ. विभूती पटेल यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानांतर्गत समाजशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभागातर्फे 'गर्ल चाईल्ड इन इंडिया - इश्यूज अँड प्रॉस्पेक्ट्स' या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय वेबिनार झाला. यावेळी ते बोलत होते. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव प्रमुख उपस्थित होते.**



डॉ. पटेल म्हणाले, 'आज मुली सर्व क्षेत्रांमध्ये अग्रेसर आहेत. देशाच्या प्रगती, विकासात मुलींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. परंतु, आजही काही ठिकाणी त्यांना भेदभावासह योग्य सामाजिक दर्जा प्राप्त करण्यासाठी झगडावे लागत आहे. हे अत्यंत दुर्दैवी आणि चिंताजनक आहे. भारत सरकारच्या विविध योजनांमुळे मुलींना उच्च शिक्षण घेण्याबरोबरच अनेक विविध क्षेत्रांची कवाडे खुली झाली आहेत.' प्रा. श्रुती तांबे (पुणे), मेधावीनी नामजोशी (मुंबई), जयश्री वेलणकर (नवी दिल्ली) यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या डॉ. आसावरी जाधव यांनी केले. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन इंग्रजी अधिविभागातील स्नेहल पाटील यांनी केले.

# परीक्षा पर्यायाची पडताळणी करावी

## परीक्षा विभागाचे विद्यार्थ्यांना आवाहन

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा मंगळवार (ता. २७)पासून होणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून ऑफलाइन किंवा ऑनलाईन परीक्षा घेण्याचे पर्याय निवडले आहेत. विद्यार्थ्यांचे नाव आणि त्यांनी निवडलेले पर्याय याची यादी महाविद्यालय आणि अधिविभागात प्रसिद्ध करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी याची पडताळणी करावी, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे. ज्या परीक्षार्थ्यांनी नव्याने ऑफलाईनमधून ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडलेला आहे त्यांना त्यांचे लॉगीन व पासवर्ड पाठविण्यात येत आहेत.

मंगळवार (ता.२७) पासून सुरु होणाऱ्या (पदविका, पदव्युत्तर पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रम वगळता) सर्व अभ्यासक्रमांची परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली असून ही वेळापत्रके संबंधित अधिविभाग, महाविद्यालये यांना पाठविण्यात आलेली आहे. तरी परीक्षार्थ्यांनी ही वेळापत्रके पाहून परीक्षेची तयारी करावी, असे आवाहन परीक्षा विभागाने केले आहे.

# नमिता खोत यांचा सन्मान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता बाबासाहेब खोत यांना 'मोस्ट डायनॅमिक लायब्ररी अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना डायनेर्जिक बिझनेस सोल्युशन्सच्या वतीने 'शिक्षणातील श्रेष्ठतम गुणवत्ता व नेतृत्व' या ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# डॉ. नमिता खोत यांना पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता बाबासाहेब खोत यांना मोस्ट डायनेमिक लायब्ररी अॅवॉर्ड प्रदान करण्यात आला. डायनेमिक बिझनेस सोल्युशन संस्थेतर्फे शिक्षणातील श्रेष्ठतम गुणवत्ता व नेतृत्व या ऑनलाइन घेण्यात आलेल्या राष्ट्रीय कार्यशाळेत हे अॅवॉर्ड ऑनलाइन पद्धतीने देण्यात आले. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात डॉ. नमिता खोत यांनी केलेले नावीन्यपूर्ण कार्य, उपक्रम आणि विद्यार्थ्यांना दिलेले प्रोत्साहन यांची दखल घेऊन हा अॅवॉर्ड त्यांना देण्यात आला. याबद्दल त्यांचे शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अभिनंदन केले.



# अंतिम वर्ष परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २७ ऑक्टोबरपासून सुरू असणाऱ्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षेसाठी परीक्षार्थ्यांनी ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीच्या परीक्षेच्या पर्यायाची विद्यार्थीनिहाय यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

ज्या परीक्षार्थ्यांनी नव्याने ऑफलाईनमधून ऑनलाईन परीक्ष पद्धतीचा पर्याय निवडला आहे. त्यांन त्यांचे लॉगीन व पासवर्ड पाठविण्यात येत आहेत. संबंधित परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठ संकेतस्थळावर आहेत. अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन परीक्षा विद्यापीठ संगणकप्रणालीतून होणार नाहीत. संबंधित विद्यार्थ्यांनी अधिविभाग, महाविद्यालय यांच्या संपर्कात राहण्याचे आवाहन केले आहे.

ऑनलाईन परीक्षा देताना फोन, लॅपटॉप, डेस्कटॉप यांना कॅमेरा असणे बंधनकारक परीक्षार्थीने परीक्षा सुरू केल्यानंतर 'अलाऊ ॲसेस टू वेब कॅमेरा' अशी सूचना आल्यानंतर ज्यांना कॅमेरा सुरू ठेवावयाचा असेल त्यांनी 'एस' पर्याय निवडावा व वेब कॅमेरा वापरणार नसणाऱ्या विद्यार्थ्यांनी 'नो' असा पर्याय निवडून पुढे जावे. ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षा देताना कोणत्याही प्रकारचे पुस्तक नोटस, वही, भ्रमणध्वनी डिजिटल डायरी इतर साधने यांचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.